**पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांचे कार्यालय ,**
चव्हाण नगर, पाषाण रोड, पुणे ४११ ००८
दुरध्वनी क्रमांक ०२०- २५६५७०७८ फॅक्सक्र. ०२०-२५६७४६४१
ई मेल sp.pune.r @mahapolice.gov.in
(आस्थापना शाखा)

जा.क्र. आशा-१/प्रलि/पोशि-नियुक्ती/पो.भरती-२०२१/२०२३/ 6506 पुणे दिनांक :- 30 /०५/२०२३.

**संदर्भ :-** महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम-२०११ मधील नियम १२ अन्वये

**विषय :- पोलीस शिपाई भरती-२०२१**
**पोलीस शिपाई पदावर अस्थायी व तात्पुरत्या स्वरुपात नेमणूकीबाबत...**

-----000-----

**आ दे श :-**

पुणे ग्रामीण जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवरील सन २०२१ मधील रिक्त असलेल्या पोलीस शिपाई पदासाठी पोलीस भरती प्रक्रिया आयोजित करण्यात आली होती. सदर पोलीस भरती दरम्यान लेखी परीक्षा व मैदानी चाचणीमध्ये गुणानुक्रमे, सामाजिक व समांतर आरक्षणानुसार पोलीस शिपाई पदासाठी निवड झालेल्या उमेदवारां पैकी खालील उमेदवारांची कागदपत्र पडताळणी, वैद्यकीय तपासणी व चारित्र्य पडताळणी झाली असून ते पोलीस शिपाई पदावर नियुक्ती देणेसाठी पात्र ठरलेले आहेत.

महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९, भाग-१ मधील नियम क्रमांक ६३ मध्ये दिलेल्या अधिकारानुसार खालील नमूद उमेदवार यांना पुणे ग्रामीण जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवर **"पोलीस शिपाई" गट-क** या संवर्गात सुधारित वेतन मॅट्रीक्स मधील वेतन स्तर एस-७ रुपये २१७००-६९१०० मधील वेतन रुपये २१७००/- या प्रारंभिक वेतनावर (विशेष वेतन रुपये ७५०/- व अधिक नियमानुसार देय असणारे भत्ते याप्रमाणे) दि. ३० /० ५/२०२३ पासून खालील नमूद अटी व शर्थीचे अधीन राहून **अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती** देण्यात येत आहे.

| अ.क्र. | चेस्ट क्रमांक | उमेदवाराचे नांव | लिंग | जात प्रवर्ग | निवड प्रवर्ग | समांतर आरक्षण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २२६१४ | समाधान दत्तात्रय मोळावडे | पुरुष | इ.मा.व. | इ.मा.व. ✓ | भूकंपग्रस्त |

**अटी व शर्ती :**

१. पोलीस शिपाई या पदावर नियुक्ती अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची राहील. शासनास त्यांच्या सेवेची आवश्यकता नसल्यास कोणत्याही प्रकारचे कारण न दर्शविता अथवा आगाऊ सूचना न देता केव्हाही सेवेतुन सेवामुक्त करण्यात येईल.

२. पोलीस शिपाई पदावर आपली नियुक्ती ही अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने कोणतेही कारण न देता मुंबई पोलीस नियमावली १९५९ भाग-१ मधील नियम क्रमांक ७८(१)(i) ते (viii) अन्वये आपली सेवा केव्हाही समाप्त करण्याची तरतुद आहे अथवा मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) नियम १९५६ मधील तरतुदीनुसार सेवा समाप्त करण्यात येईल.

३. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम-२०११ मधील नियम १२ अन्वये नवप्रविष्ठ पोलीस शिपाई पदासाठी विहित केलेले मुलभूत प्रशिक्षण पूर्ण करणे बंधनकारक राहील. सदर प्रशिक्षणांती घेण्यात येणारी परीक्षा चार संधीमध्ये उत्तीर्ण व्हावी लागेल. जर चार संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण झाला नाही तर त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल. सदर परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत कालावधीत त्यांना वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही.

४. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी-२०११/ प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब,दि.१२/१२/२०११ अन्वये मागासवर्गीय उमेदवारांना जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याचे अधीन राहून निव्वळ तात्पुरती स्वरुपात नियुक्ती करण्यात आली आहे.



Scanned with OKEN Scanner